Received on: 28/06/2023

District Judge- 1 and
Dt: 28/6/2023 Additional Sessions Judge, Sangli.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0452 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/06/2023 01:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगळवार **Date From (दिनांक पासून):** 27/06/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/06/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Time From (वेळेपासून):** 17:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/06/2023 **Time (वेळ):** 01:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/06/2023 01:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** प्रमुख फायर स्टेशन टिंबर एरिया,सांगली येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री अभिजीत अनिल चव्हाण

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अनिल चव्हाण

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | कमल निवास रामांदिर चौक सांगली,ता मिरज जि सांगली ,विश्राम बाग, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | कमल निवास रामांदिर चौक सांगली,ता मिरज जि सांगली ,विश्राम बाग, सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9371167777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री विजय आनंदराव पवार | | वडील का नाम : आनंदराव पवार | 1. जोशी प्लट संभाजीनगर सांगली वाडी ता मिरज जि सांगली, विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि.28/06/2023

मी अभिजित अनिल चव्हाण वय 31 वर्षे व्यवसाय-फायरफायटिंग सिस्टीम बसविणे, रा.राममंदिर चौक, सांगली
मो.नं.9371167777
मी वरील प्रमाणे असुन माझी बहिण दिपा नवीन रामचंदानी रा.मिरज हिचे नांवे जीएलसी ग्रुप ऑफ फायर अँन्ड
सेफ्टी इंजिनिअरर्स राम मंदिर सांगली ही कंपनी आहे. सदर कंपनी मार्फत फायरफायटिंग सिस्टीम बसविणेचे काम
करण्यात येते. सदर कंपनी मार्फत करण्यात येणारे कामावर तसेच कागदपत्रांचे पुर्ततेचे काम मी पाहता असतो.
दि.15.06.2023 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथील पोलीस उपअधीक्षक श्री.संदीप पाटील यांना संपर्क
करुन कळविले की, विजय पवार मुख्य अग्नीशमन अधिकारी सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका अग्नीशमन व
आणीबाणी सेवा विभाग गुरुव्दारा जवळ टिंबर ऐरिया सांगली यांनी ज्युबीली टेक्सटाईल इंडस्ट्रीजचे डायरेक्टर श्री.
राजेंद्र प्रेमचंद घोडावत यांच्या नमुद कंपनी मध्ये फायर फायटिंग सिस्टीमचा अंतिम दाखला दिल्याचा मोबदला
म्हणुन माझ्याकडे 1,50,000/- रु लाचेची मागणी केली आहे. मी दिनांक 13/06/2023 रोजी मिहीर्स विश्वशांती
गुरुकुल या शाळेची नुतनीकरणाची फाईल घेवुन विजय पवार यांचेकडे गेलो होतो.त्यावेळी त्यांनी घोडावत यांच्या
अंतिम दाखल्याच्या कामाचे 1,50.000/- रु दे नाहीतर तुझे मिहीर्स विश्वशांती गुरुकुल या शाळेची फाईल दाखल
करुन घेणार नाही असे म्हणुन माझ्याकडे घोडावत यांच्या अंतिम दाखला दिल्याचा मोबादला म्हणुन 1,50,000/-
रु लाचेची मागणी करुन मिहीर्स विश्वशांती गुरुकुल या शाळेची नुतनीकरणाची फाईल दाखल न करताच त्यांच्याकडे
ठेवुन घेतली. मी घोडावत यांचे कामाचे 1,50.000/- रु लाच मागणी केली असल्या बाबत सांगितले. त्यावेळी
पाटील साहेबानी मला कार्यालयात येणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे मी दुपारी 4.35 वा चे सुमारास पाटील साहेब
यांची त्यांचे कक्षा मध्ये भेट घेतली त्यावेळी पाटील साहेबांनी मला सदर ठिकाणी हजर असले पोलीस निरीक्षक
भिलारे साहेब यांची ओळख करुन दिली मी भिलारे साहेबांना माझी वरील मजकुरची तक्रार सांगितली. त्यानंतर मी
नमुद मजकुरचा हस्तलिखीत सविस्तर तक्रारी अर्ज दिला.
त्यानंतर भिलारे साहेबांनी दोन पंच अँन्टी करप्शन कार्यालयात बोलावुन घेऊन मला सापळा पथकाची व दोन
सरकारी पंचांची ओळख करुन दिली. भिलारे साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली
त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली.

त्यानंतर भिलारे साहेबांनी मला विजय पवार मुख्य अग्नीशमन अधिकारी सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका
अग्नीशमन व आणीबाणी सेवा विभाग गुरुव्दारा जवळ टिंबर ऐरिया सांगली यांचे विरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे
अनुषंगाने पंचा समक्ष केले पडताळणी कारवाईमध्ये मी व पंच माने असे विजय पवार यांचे कक्षामध्ये गेलो. विजय
पवार मुख्य अग्नीशमन अधिकारी सांगली यांचेशी "शिवशक्ती व्यायाम मंडळाला आदित्य साई लॅन्ड मार्क त्या बिल्डींग
मध्ये सुरु केलेल्या विघ्नेश्वर आयुर्वेदिक हॉस्पिटलचा दाखला रिन्युव्ह करणे करिता लागणारी कागदपत्रे, भरावा
लागणारा दंड याबाबत चर्चा करुन माझे मोबाईलवर घोडावत यांचा ते देशा बाहेर असले बाबतचा मला आलेला मेसेज
दाखविला असता विजय पवार यांनी मी बघुन काय करु, काय सांगायच तुला, तुला माहित हाय सगळ, तुझ तु
केलायस मी काय करु माझी काय चुक हाय असे म्हणुन ते घोडावताचे कामा बाबत चर्चा केली. त्यावेळी मी विजय
पवार यांना "साहेब दीड लाख रुपये सांगितलेला पण साहेब त्यातन किती राहिल किती राहत्यात बघाना मला" असे
म्हणालो. तेव्हा त्यांनी "तु सांगितलेल्या पध्दतीने केलाय मी सगळ" असे म्हणाले, मी "काही तरी करा की जरा थोड
प्लीज" असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला मिहीर्स विश्वशांती गुरुकुलचे (एमआयटी) फाईलचे काम राहिले
असल्याचे सांगितले. त्यावेळी विजय पवार यांनी मला हाताने एक आणि अर्धा असा इशारा करुन दीड लाख रुपयांची
मागणी केली. मी त्यांना "तेवढ नको व साहेब ऐका की," असे म्हणालो तेव्हा त्यांनी "न्हाय न्हाय तुझ तु बघ काय
करायचय तुच सांग" असे म्हणाले मी त्यांना "पंच्याहत्तर घ्या" असे म्हणुन कमी करणे बाबत विनंती केली त्यावेळी
त्यांनी "न्हाय न्हाय होत न्हाय त्यात" असे म्हणुन कमी करणेस नकार देऊन "तुझी सगळी काम करुन दिल्यात



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

लक्षात ठेव, तुला आडव लावल न्हाय तुझी अडचण समजुन घेतली" असे म्हणाले तेव्हा मी "साहेब तुम्ही दीड लाख रुपये म्हणताय त्यातल किती राहणार हाय सांगा साहेब" असे म्हणालो तेव्हा त्यांनी "पंचवीस कमी कर बाकीच राहिलेल दे" असे म्हणुन माझ्या कडे 1,25,000/- रु लाचेची मागणी केली. त्यांना मी "सर एक लाख पंचवीस हजार लई होत्यात" असे म्हणुन कमी करणे बाबत विनंती केली विजय पवार कमी करण्यास हाताने इशारा करुन नकार दिला तेव्हा मी "एक लाख पंचवीस हजार ठिक हाय उद्या सकाळी दहा साडे दहा वाजता" असे म्हणालो असल्याचे निष्पन्न झाले. भिलारे साहेबांनी मला व पंच माने यांना पडताळणीची हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉडींग ऐकुण वरील प्रमाणे संभाषण झाल्याची खात्री केली.

त्यानंतर विजय पवार यांचे विरुध्द सापळा कारवाई आयोजित करणे करिता भिलारे साहेबांनी मला 1,25,000/- रु उपलब्ध आहेत का असे विचारले असता मी त्यांना एवढी रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यावेळी भिलारे साहेबांनी मला 1,25,000/- रु उपलब्ध झाले नंतर त्यांना किंवा पोलीस उपअधीक्षक श्री.पाटील साहेब यांना संपर्क करणे बाबत सुचना दिल्या.

दिनांक 23/06/2023 रोजी विजय पवार यांचा रात्री 9.00 वा चे सुमारास माझे मोबाईलवर मिस्ड कॉल आल्याने मी त्यांना कॉल केला असता त्यांनी घोडावतचे कामा बाबत माझेशी चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना घोडावत यांचेकडुन बिल आल्या नंतर भेटायला येतो असे सांगितले.

दिनांक 27/06/2023 रोजी माझ्याकडे 1,25,000/- रु उपलब्ध झाल्याने मी पाटील साहेबांना संपर्क करुन सांगितले. पाटील साहेबांनी मला कार्यालयात येणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर झालो. विजय पवार यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 1,25,000/- रुपये नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशयात ठेवल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने भिलारे साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चीत करणे करिता भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9371167777 वरुन विजय पवार यांचे मोबाईल नंबर 9834803377 वर कॉल केला असता त्यांनी ऑफिस मध्ये असल्याचे सांगुन कॉल कट केला. भिलारे साहेबांनी विजय पवार यांचे विरुध्द सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका अग्नीशमन व आणीबाणी सेवा विभाग गुरुव्दारा जवळ टिंबर ऐरिया सांगली कार्यालयात सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चीत केले. सापळा कारवाई दरम्यान मी व पंच माने असे विजय पवार यांचे परवानगी घेवुन त्यांचे कक्षा मध्ये जाऊन त्यांचे समोर असले खुर्ची मध्ये बसलो. त्यावेळी विजय पवार यांनी माझ्याकडे "किती आणलायस" असे म्हणुन लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना "देऊ दे ? तुम्ही सांगितलेले एक लाख पंचवीस हजार आणले आहेत देऊ साहेब तुम्हाला" असे म्हणलो असता त्यांनी पैसे देणे बाबत हाताने इशारा केल्यावर मी माझे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिश्यातील अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम उजवे हाताने बाहेर काढुन विजय पवार यांचे समोर धरुन "मोजुन घ्या" असे सांगितले त्यावेळी त्यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्याचे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिश्यात ठेवली आणि "आत्ता कुठ इथ मोजत बसतो" असे मला सांगितले. त्यानंतर त्यांनी एमआयटीच्या कामा बाबत माझ्याशी चर्चा केली आमच्यातील चर्चा संपल्या नंतर मी व पंच विजय पवार यांचे केबीन मधुन बाहेर आलो दुसरे मजल्या वरुन खाली येवुन मी रुमालाने तोंड पुसुन लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावरुन भिलारे साहेब, पाटील साहेब, पंच धेंडे व सापळा पथक असे सदर ठिकाणी येऊन विजय पवार प्र मुख्य अग्नीशमन अधिकारी यांना 18.25 वा. चे सुमारास पकडले.

सदर ठिकाणी भिलारे साहेबांनी विजय पवार प्र मुख्य अग्नीशमन अधिकारी यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विजय आनंदराव पवार, वय 50 वर्ष, व्यवसाय - (फायरमन) प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली वर्ग-3 रा.जोशी प्लॉट संभाजीनगर, त्रिमुर्ती कॉलनी सांगली. असे असल्याचे सांगीतले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, सांगलीच्या कार्यालयात पूर्ण करण्यात आली.

तरी दि.15/06/2023 रोजी विजय पवार प्र मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी माझ्याशी मिहीर्स विश्वशांती गुरुकुलचे (एमआयटी) फाईलचे नुतनीकरणाचे कामा बाबत चर्चा करुन घोडावत यांचे ज्युबीली टेक्सटाईल इंडस्ट्रीज मध्ये बसविलेल्या फायर फायटिंग सिस्टीमचा अंतिम दाखला दिल्याचा मोबदला म्हणुन माझ्याकडे 1,50,000/- रु लाचेची मागणी करुन चर्चेअंती 1,25,000/- रु लाचेची मागणी करुन दिनांक 27/06/2023 रोजी सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली वर्ग-3 रा.जोशी प्लॉट संभाजीनगर, त्रिमुर्ती कॉलनी सांगली. येथील विजय पवार बसत असले कक्षा मध्ये माझेकडुन 1,25,000/- रु लाच रक्कम स्वत: स्विकारली



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

आहे. म्हणून माझी श्री. विजय आनंदराव पवार, वय 50 वर्षे, व्यवसाय - (फायरमन) प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली वर्ग-3 रा.जोशी प्लॉट संभाजीनगर, त्रिमुर्ती कॉलनी सांगली.यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलेखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा

समक्ष

दिला यदी जबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJAY SHIVAJIRAO MORE(I (Inspector)) / PBMAH72651 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर
विश्रामबाग पोलीस स्टेशन,सांगली.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANJAY SHIVAJIRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH72651



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner